| CRITERION – 2<br>TEACHING- LEARNING AND EVALUATION | |
|---|---|
| **Key Indicator** | **2.3 Teaching- Learning Process** |
| **Metric No.** | **2.3.1** |

- **Student centric methods, such as experiential learning, participative learning and problem solving methodologies are used for enhancing learning experiences using ICT tools**


- **Newspaper clips**



# 'रंगूनवाला हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट' मध्ये 'बेकर्स डे' साजरा

पुणे : 'एम ए रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट'मध्ये ८ ऑक्टोबर हा इंटरनॅशनल 'बेकर्स डे' म्हणून साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पाव आणि बेकिंगच्या विविध प्रकारच्या रेसिपी तयार करण्याच्या स्पर्धेत भाग घेतला. विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. 'हयात रिजेन्सी' चे एक्झिक्युटिव्ह शेफ राजदीप शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य अनिता फ्रांत्झ यांनी स्वागत केले. हॉटेल व्यवसायात कष्ट आणि झोकून देण्याची वृत्ती आवश्यक असते, त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत' असे प्रतिपादन राजदीप शर्मा यांनी केले.





# 'POUSAD' – 'Goan Theme Lunch Festival' at M A Rangoonwala Institute of Hotel Management

Pune :'Goan Theme Lunch -a food festival ' of 'M A Rangoonwala Institute of Hotel Management' was inaugurated in presence of P.A .Inamdar (President of MCE Society), Abeda Inamdar (Vice President, of MCE Society ). Anita Frantz (Principal, 'M A Rangoonwala Institute of Hotel Management' ) welcomed guests.

meaning a 'small inn serving traditional & homemade food' was organized by the second year students of M.A.Rangoonwala Institute of Hotel Management & Research. This theme lunch was a treat of the glorious flavours of Goa with an extensive range of traditional mouthwatering dishes from the vibrant Goan

year old Portuguese Culture.

It showcased an array of authentic and sumptuous Goan cuisine which featured elements of Goan culture.

Goan cuisine consisting of regional foods such as Goan fish curry rice, Chicken Vindaloo, Prawns Balchao, Potato & Mushroom Xacuti and Dodol were few of the

# हॉटेल व्यवसायात कष्ट आवश्यक

पुणे : एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये 'इंटरनॅशनल बेकर्स डे' साजरा करण्यात आला. या वेळी विविध पाककृती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. शेफ राजदीप शर्मा, प्राचार्य अनिता फ्रांत्झ आदी या वेळी उपस्थित होते. 'हॉटेल व्यवसायात कष्ट आणि झोकून देण्याची वृत्ती आवश्यक असते. त्यादृष्टीने विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावेत,' असे मार्गदर्शन शर्मा यांनी केले. (प्रतिनिधी)

www.maharashtratimes.com

मटा +TOI: पुण्यात नंबर १

महाराष्ट्र टाइम्स

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ▪ सोमवार, ८ ऑगस्ट २०१६



## रंगूनवाला कॉलेजमध्ये चर्चासत्राचे आयोजन

कॅम्पस हॅपनिंग्ज

पुणे : महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या 'एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्च'तर्फे तीन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'द आर्ट ऑफ लिव्हिंग सेंटर फॉर स्किल डेव्हलपमेंट'च्या वतीने 'कौशल्य विकास' या विपयावर हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. विविध तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटच्या वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला. प्राचार्य अनिता फ्रान्स या वेळी उपस्थित होत्या.

प्रभात
Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे 03 गुड मॉर्निंग प्रभात पुणे, बुधवार, दि. १६ मार्च २०१६

# अन्नभेसळ नियंत्रित करणे आव्हानात्मक

## अजमेरा : अन्नपदार्थ सुरक्षा कायदा–सुधारणा विषयावर चर्चा

पुणे, दि. १५ (प्रतिनिधी)- स्वतःच्या स्वार्थासाठी अन्नपदार्थात भेसळ करण्याच्या प्रवृत्ती एकविसाव्या शतकातही सुरू आहे. त्यामुळे औषध नियंत्रणाहून अन्नातील भेसळ नियंत्रित करणे हे आव्हानात्मक आणि महत्वाचे सरकारी काम बनले आहे, असे प्रतिपादन अन्न आणि औषध प्रशासनाचे माजी सहसंचालक जयकुमार अजमेरा यांनी व्यक्त केले.

> अन्न गुणवत्तेची मानके सांभाळणे हॉटेल व्यवसायात महत्त्वाचे आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय पातळीवरही तसे नियम पाळले जाताना दिसत नाहीत. अन्न सुरक्षित, विनाभेसळ मिळावे, यासाठी चांगल्या व्यावसायिक कार्यपद्धतीबाबत आपण उदासीन आहोत.
>
> -प्रा. सईद अरिफुद्दीन

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अॅण्ड रिसर्चतर्फे आयोजित अन्नपदार्थ सुरक्षा कायदा-सुधारणा आणि अंमलबजावणी या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. इन्स्टिट्यूटच्या प्राचार्य अनिता फ्रान्स, विषयतज्ज्ञ दुर्गाप्रसाद पांडा, प्रा. डॉ. सईद अरिफुद्दीन उपस्थित होते.

अजमेरा म्हणाले, अन्नभेसळ रोखण्यासाठी सुरुवातीपासून अनेक कायदे करण्यात आले आहेत. त्यात वारंवार सुधारणा करण्यात येत आहे. मात्र, मानवाचा स्वार्थ वाढतच असल्याने भेसळही वाढत आहे. इंडियन फूड कोडनुसार अन्नपदार्थांची व्याख्या २४ पदार्थांना लागू होते. यामध्ये मानवी पातळीवरील भेसळ, रासायनिक, जैविक भेसळ असे अनेक प्रकारे भेसळ होते. त्यासाठी सरकारी पातळीवर अनेक उपाय योजना केल्या जात असतात. अन्नपदार्थांतील भेसळीवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे आणि ते महत्त्वाचे काम बनत आहे.

वर्ष : १३६
Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

अंक ७५ • पृष्ठे : १० • तीन रुपये • बुधवार, १६ मार्च २०१६, पुणे C (शहर आवृत्ती)

केसरी    पुणे    पुणे, १६ मार्च २०१६/५

## अन्नभेसळ नियंत्रण करणे महत्त्वाचे : अजमेरा

पुणे : स्वतःच्या स्वार्थासाठी अन्नपदार्थात भेसळ करण्याची प्रवृत्ती एकविसाव्या शतकातही पुढे चालू असल्याने औषध नियंत्रणाहून अन्नातील भेसळ नियंत्रित करण्याचे काम अधिक आव्हानात्मक आणि महत्त्वाचे सरकारी काम बनले आहे, असे प्रतिपादन अन्न आणि औषध प्रशासनाचे माजी सहसंचालक जयकुमार अजमेरा यांनी केले. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए.रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च तर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com



# अन्नभेसळ नियंत्रण महत्त्वाचे : अजमेरा

**पुणे : प्रतिनिधी**

स्वतःच्या स्वार्थासाठी अन्नपदार्थात भेसळ करण्याच्या प्रवृत्ती एकविसाव्या शतकातही पुढे चालू राहिल्याने औषध नियंत्रणाहून अन्नातील भेसळ नियंत्रित करणे हे आव्हानात्मक आणि महत्त्वाचे सरकारी काम बनले आहे, असे प्रतिपादन अन्न आणि औषध प्रशासनाचे माजी सहसंचालक जयकुमार अजमेरा यांनी केले.

महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रीसर्चतर्फे आयोजित 'अन्नपदार्थ सुरक्षा कायदा-सुधारणा आणि अंमलबजावणी' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. या वेळी इन्स्टिट्यूटच्या प्राचार्य अनिता फ्रान्झ, विषयतज्ज्ञ दुर्गाप्रसाद पांडा, प्रा. डॉ. सईद अरिफुद्दीन उपस्थित होते.

अजमेरा म्हणाले, अन्नभेसळ रोखण्यासाठी अनेक कायदे आहेत. मात्र, मानवाचा स्वार्थ वाढतच असल्याने भेसळही वाढत आहे. 'इंडियन फूड कोड'नुसार अन्नपदार्थाची व्याख्या २४ पदार्थांना लागू होते. यामध्ये मानवी पातळीवरील भेसळ, रासायनिक, जैविक भेसळ असे अनेक प्रकारे होते. त्यासांठी सरकारी पातळीवर अनेक उपाय योजना केल्या जात असतात.

# AZAM News


For Private Circulation

Newsletter of Azam Campus

www.azamnews.in

NOVEMBER 2016 No. 206


One Day State Level Seminar on **The Future of Hospitality & Research Travel Worldwide** was organized by the M. A. Rangoonwala Institute of Hotel Management & Research in association with Savitribai Phule Pune University under Quality Improvement Programme on 14th October 2016. The session was inaugurated by Prof. Anita Frantz in the presence of guest speaker Mr. Hishal Datwani, Ibis Western India, Learning and Development Manager Accor Hotels. Mr. Hishal spoke on retaining competent, effective and diverse staff, guest security and safety with regards to the future of hospitality. The second session was conducted by Mr. Mandar Bhosale, Sales Manager and Courtyard by Marriott on Social Media Marketing, Customer Behavior Online and Customer Relation Management.




In the final session Mr. Shabib Ahmed Shaikh, Senior Technical Officer (IT), CSIR Unit for Research and Development of Information Products (URDIP), NCL gave an extensive and detailed information on new technologies that enhance competitiveness and mobile application and meta search engine.

Scanned with CamScanner



# रंगूनवाला कॉलेजमध्ये फूड फेस्टिव्हल

**पुणे :** 'एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट'मध्ये 'गोवन थीम लंच' या 'फूड फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले होते. 'महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'चे अध्यक्ष डॉ. पी. ए. इनामदार, उपाध्यक्ष आबेदा इनामदार यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. गोव्याची आठवण करून देणारी सजावट विद्यार्थ्यांनी केली होती. इन्स्टिट्यूटने नुकतेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 'विद्यार्थी कल्याण मंडळ'च्या सहकार्याने एकदिवसीय कार्यशाळेचेही आयोजन केले होते. ही कार्यशाळा 'करिअरच्या प्रगतीसाठी स्व-विकास' या विषयावर होती. डॉ. प्रियांका राव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य अनिता फ्रान्झ या वेळी उपस्थित होत्या.

## राज्यस्तरीय कार्यशाळा

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीची एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्च ही संस्था आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'जागतिक स्तरावरील प्रवास आणि हॉटेल व्यवसायाचे भविष्य' या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. हिशाल दतवानी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य अनिता फ्रान्झ, मंदार भोसले, वरिष्ठ तांत्रिक अधिकारी शाबीब अहमद शेख उपस्थित होते.




# एम.सी.ई.एस.ऑनलाईन साप्ताहिक

अंक : ४४: वर्ष पहिले • दिनांक : २२ ऑक्टोबर २०१६ • वार : शनिवार • Email : pmadhyam09@gmail.com




महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसर्च आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.


## जागतिक स्तरावरील प्रवास आणि हॉटेल व्यवसायाचे भविष्य विषयावर रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या वतीने कार्यशाळा संपन्न

पुणे : महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड रिसर्च आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने गुणवत्ता सुधार कार्यक्रमातंर्गत एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा जागतिक स्तरावरील प्रवास आणि हॉटेल व्यवसायाचे भविष्य या विषयावर आधारित होती. महाविद्यालयाच्या हाय टेक हॉलमध्ये कार्यशाळा संपन्न झाली.

हिशाल दतवानी (अ‍ॅकर हॉटेलचे शिक्षण आणि विकास व्यवस्थापक, इबीस वेस्टर्न इंडिया) कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य अनिता फ्रान्झ यांनी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन केले. यावेळी मंदार भोसले (मॅरियाट हॉटेलचे विक्री व्यवस्थापक), वरिष्ठ तांत्रिक अधिकारी शाबीब अहमद शेख आदी उपस्थित होते.

हॉटेल व्यवसायामध्ये सक्षमता, प्रभावी आणि विविध प्रकारचे कर्मचारी, अतिथी सुरक्षा आणि सुरक्षितता या गोष्टींचे महत्व याविषयी हिशाल दतवानी यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये मंदार भोसले यांनी सोशल मीडिया मार्केटींग, ऑनलाईन कस्टमर बिहेवियर आणि ग्राहक संबंध व्यवस्थापक

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी च्या वतीने सर्वांना


Scanned with CamScanner

# नव राष्ट्र

नवभारत समूहाचे मराठी वृत्तपत्र

सदैव आपल्या वाचकांसोबत

नवराष्ट्र, पुणे, ६ नोव्हेंबर २०१६



## शपथ स्वच्छतेची...



पुणे : महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयात विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी परिसर, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी कार्यरत राहण्याची शपथ घेतली.

www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर १

# महाराष्ट्र टाइम्स

पुणे, गुरुवार, २३ फेब्रुवारी २०१७

## रंगूनवाला कॉलेजात 'बुकरिव्ह्यू' स्पर्धा

**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्चच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आंतरमहाविद्यालयीन 'पुस्तक पुनरावलोकन' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. एम. ए. रंगूनवाला कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अँड रिसर्चच्या प्राचार्य डॉ. रोनिका अगरवाल यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. प्राचार्य अनिता फ्रान्त्झ उपस्थित होत्या. या स्पर्धेत डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या स्वाती सुमन या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे अल्लाना कॉलेज ऑफ फार्मसीच्या फातिमा मुजावर आणि एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या सनोबर मीरला मिळाले.

Salam Pune online portal
* Dipak Bedkar



# 'माहेर वात्सल्यधाम' संस्थेत महिला दिन साजरा

Posted By: SHARAD LONKAR   Posted date: March 11, 2017   in: Feature Slider, Local Pune   No Comments

पुणे :
महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम ए रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट तर्फे 'माहेर वात्सल्यधाम '(वाघोली) या निराधार महिलासाठी कार्यरत संस्थेत जागतिक महिला दिन साजरा करण्यात करण्यात आला. यावेळी निराधार महिलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम ,खेळ आयोजित करण्यात आले. हॉटेल मॅनेजमेंट विद्यार्थ्यांनी केलेला केक यावेळी  कापण्यात आला. प्राचार्य अनिता फ्रांट्झ यांनी संयोजन केले. सिस्टर कॅसेन्ड्रा.

सिस्टर सुप्रभा यांनी स्वागत केले. २५० महिला या उपक्रमात सहभागी झाल्या

Sakal Times

WEDNESDAY MARCH 15, 2017

Sakal Times

city

4

# IHMR celebrates Int'l Women's Day at Maher

ST CORRESPONDENT
reporters@sakaaltimes.com

**Pune:** MCE Society's MA Rangoonwala Institute of Hotel Management and Research (IHMR) celebrated International Women's Day at 'Maher', a non-governmental organisation (NGO) for women at Wagholi, recently.

Many fun games and cultural activities were organised. The students presented a skit dedicated to the women. Prof Anita Frantz, Principal of MA Rangoonwala IHMR, congratulated the students for their efforts and also all the women who had gathered at the event.


Students served snacks and cake made by them to the women present at the event. There were almost 250 women who took part in the celebration.

पुणे, शुक्रवार, २१ जुलै २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

TODAY पुणे शहर

सकाळ ८



एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्चचा ११ वा 'स्थापना दिन'निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेले शिक्षकांसह विद्यार्थी.

## स्थापना दिन साजरा

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्चचा ११ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्राचार्य अनिता फ्रान्त्झ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नोवाटेल इमॅजिका महाव्यवस्थापक श्रीनिवास श्रीरंगम्, पुणे जिल्हा परिषद सदस्य रेखा बांदल, नासिर शेख, पंकज प्रधान या वेळी उपस्थित होते.

पुणे, गुरुवार, १४ सप्टेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

## अनुग्रह देशपांडे प्रथम

महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्चमध्ये महाविद्यालयीन 'रिसर्च पेपर प्रेझेंटेशन स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. 'वाचन माध्यमातून शिका' हा स्पर्धेचा विषय होता. या स्पर्धेत अनुग्रह देशपांडे याचा प्रथम क्रमांक आला, तर अब्दुल मुलाणी याने द्वितीय क्रमांक पटकाविला. महाविद्यालयाच्या प्राचार्या अनिता फ्रान्त्झ यांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी देण्यात आली. या स्पर्धेत परीक्षक म्हणून प्रा. मुमताज शेख आणि प्रा. राबिया लागू यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथपाल चंदा सुपेकर आणि प्रा. प्रियांका शेट्टी यांनी केले होते.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+८+CNX/८ = २८, किंमत : ₹ ४.००
पुणे, शुक्रवार, दि. १९ जानेवारी २०१८



# सायबर गुन्ह्याबाबत मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

कॅम्प : महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्च आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. 'सायबर गुन्हे : भारतातील सर्वांत जलद वाढती फसवणूक' या विषयावरील ही राज्यस्तरीय कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा विभागाअंतर्गत नुकतीच आयोजित करण्यात आली होती, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्य अनिता फ्रांत्झ यांनी दिली. कार्यशाळेचे उद्घाटन इम्रान सय्यद यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख वक्ते शबिब अहमद शेख (वरिष्ठ तांत्रिक अधिकारी, सीएसआयआर, युनिट फॉर रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट ऑफ इन्फॉरमेशन प्रॉडक्टस, एन.सी.एल. कॅम्पस), हेमा कुलकर्णी (सीएसआर समुपदेशक), एम.सी.ई. सोसायटीचे सचिव लतिफ मगदूम उपस्थित होते. सायबर जगातील अलीकडच्या वर्षात झालेली सायबर गुन्हेगारीची वाढ आणि सायबर गुन्हेगारी प्रतिबंधचे उपाय याविषयी इम्रान सय्यद यांनी मार्गदर्शन केले. हेमा कुलकर्णी यांनी सायबर गुन्ह्यांमागील मानसशास्त्र, सायबर व्यवहार आणि इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी, या विषयावर प्रकाश टाकला.

ये बुजदिलों के खिलौने है, हम नहीं रखते — कलम ही हाथ में जिसके वो बम नहीं रखते

Estd. 1993

पुणे से प्रकाशित महाराष्ट्र का सबसे पहला हिंदी, उर्दू

दैनिक

# मेरा भारत टाईम्स

संस्थापक : मरहूम शेख अय्युब उर्फ बाबा कादरी

## एम.ए. रंगूनवाला होटल मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च में करार्ट सेल्फ डिफेन्स का आयोजन



मोहम्मद जावेद मौला

पुणे : लडकीयों और महिलाओं को समाजकंटकों से सुरक्षित रखने और अपना बचाव करने के लिए जहां आज पुणे पोलिस ने सुरक्षा ऐप, सहायता कक्ष और हेल्प लाईन शुरू की है जो सराहनीय है, लेकिन इसके बावजूद लडकीयों को स्वसंरक्षण यानी सेल्फ डिफेन्स भी बहोत ज़रूरी है। इसलिए सेल्फ डिफेन्स वर्कशॉप का आयोजन सावित्रीबाई फुले पुणे युनिवर्सिटी और एम.ए.रंगूनवाला इन्स्टिटयूट ऑफ होटल मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च द्वारा आज़म कॅम्पस के टेनिस कोर्ट में २० फरवरी २०१८ को किया गया था। इस अवसर पर के.एल. वी.एस कराटे क्लब और इंटरनॅशनल कराटे फेडरेशन पुणे शहर चीफ और ब्लॅक बेल्ट कोच अली सय्यद और उनके विद्यार्थिनीयों ने सेल्फ डिफेन्स किस तरह किया जाए, प्रदर्शन किया जिसे देखकर सभी इससे प्रभावित हुए। जिनमें प्रिंसिपल अनीता फ्रान्टज़ प्रो. प्रियांका शेट्टी, प्रो. पुनीत बॅस्सन इसीतरह आबेदा इनामदार ज्युनियर सिनीयर कॉलेज, आर्किटेक्चर कॉलेज और एम.ए.रंगूनवाला इन्स्टीटयूट ऑफ होटल मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च के विद्यार्थिनीयों ने भाग लिया था।

नवराष्ट्र

ावभारत पत्रसमूहाचे मराठी वृत्तपत्र

सदैव आपल्या वाचकांसोबत

e-paper : navarashtra.com पुणे, शुक्रवार, १६ मार्च २०१८, फाल्गुन कृष्ण चतुर्दशी पाने : १६, मूल्य : रु. ४.००

## स्नेहसंमेलन...



**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला इन्स्टीटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये रोजी वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात आले. 'बॉलरूम पार्टी' या संकल्पनेवर आधारित परफॉर्मन्स विद्यार्थ्यांनी सादर केले.

महाराष्ट्र टाइम्स

४ सोमवार, २ एप्रिल २०१८

# रंगूनवाला कॉलेजचा माजी विद्यार्थी मेळावा

**पुणे :** महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या एम. ए. रंगूनवाला हॉटेल मॅनेजमेंट अँड रिसर्च सेंटरचा माजी विद्यार्थी मेळावा नुकताच आझम कॅम्पस येथे पार पडला. मेळाव्याची संकल्पना 'बॉलिवूड' ही होती. मेळाव्याचे हे दुसरे वर्ष होते. प्राचार्य अनिता फ्रांत्झ यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सहभागी विद्यार्थ्यांनी बॉलिवूड प्रकारचे पोषाख परिधान केले होते.